११५

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHT

3rd floor, Government Transport service, Sir Pochakhanwala Rd. , Worli Mumbai

**Telephone No.24920897** **E Mail** I.D.mscpcr@gmail.com

क्र. बाहआ–2012 / 2012–13
दिनांक : 28 जानेवारी, 2013

बाल हक्क संरक्षण अधिनियम, 2005 व बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम 2009 अंतर्गत आयोगासमोरील दिनांक 23 / 1 / 2013 रोजीची सुनावणी.

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | प्रकरण | उपस्थित पक्षकारांची नांवे | आयोगाचे निष्कर्ष / आदेश |
|---|---|---|---|---|
| 1 | 508 / 2012 | पंडिता रमाबाई मुक्ती मिशन अनाथालय, नेरूळ येथील अल्पवयीन मुलीवर काळजीवाहकाने केलेल्या लैंगिक अत्याचाराबाबत. पंडिता रमाबाई मुक्ती मिशन अनाथालय, नेरूळ येथील अल्पवयीन मुलीवर काळजीवाहकाने केलेल्या लैंगिक अत्याचाराबाबत. | मिशन संचालक, उपव्यवस्थापक व निवासी व्यवस्थापक | संस्थेच्या चालकांनी संबंधित अधीक्षकांनी निलंबित करून संस्थेच्या आस्थापनेवरून काढून टाकल्याचे सांगितले. आयोगाने केलेल्या कार्यवाहीचा व भविष्यात अशी घ टना होऊ नये याकरिता घेण्यात येणा–या खबरदारीबाबतचा एक सखोल अहवाल एक आठवडयाच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले व प्रकरण अंतिम आदेशाकरिता दिनांक 5 फेब्रुवारी 2013 रोजी ठेवण्यात यावे. |
| 2 | 256 / 2012 | महाराष्ट्र टाईम्स यामधील वृत्तपत्रामध्ये आलेली बातमी वडिया हॉस्पिटलमधील 1 दिवसाचे मूल पळविले. महाराष्ट्र टाईम्स यामधील वृत्तपत्रामध्ये आलेली बातमी वडिया हॉस्पिटलमधील 1 दिवसाचे मूल पळविले. | श्री. संतोश शेट्टी, ॲडव्होकेट, वाडिया हॉस्पिटल, संस्थेचे संस्थापक श्री. जस्सावाला, व भोईवाडा पोलीस स्थेशनचे पोलीस निरीक्षक श्री. के.एस. चव्हाण.. | संस्थेचे संस्थापक श्री. जस्सवाला यांनी सदर घटना त्यांचे हॉस्पिटल सुरू झाल्यापासून प्रथमच घडल्याचे सांगितले. अशा प्रकारची दुर्घटना परत होऊ नये यासाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. केलेल्या उपाययोजनांचा अहवाल आयोगास सादर करावा असे आयोगाने निर्देश दिले व सदर प्रकरण 5 फेब्रुवारी रोजी सुनावणीकरिता ठेवले. |
| 3 | 259 / 2012 | माझे मुलास हेतुपुरस्कररित्या मारून टाकले असून अद्यापही पोस्टमार्टेम रिपोर्ट न दिल्यामुळे त्वरीत कार्यवाही करण्याबाबत. श्री.रामप्रताप आदित्यसिंग यांनी मा. मंत्री महोदया, महिला व बाल विकास यांच्याकडे | डॉ.सदानंद वाघमारे, अधीक्षक, हॉस्पिटल, ॲडव्होकेट गिरीश पर्याणी व ॲड. सागर,पोलीस उपनिरीक्षक, श्री. खामकर व तक्रारकर्ता श्री. रामप्रतापसिंग व त्याचे कुटुंबिय. | श्री. रामप्रतासिंग यांनी सदर घटनेबद्दल आयोगापुढे मांडलेल्या तक्रारीस अनुलक्षून व सादर केलेल्या हॉस्पिटलचे रिपोर्ट आयोगाच्या तज्ञ डॉक्टरांकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात यावेत असे आयोगाने आदेश दिले तसेच पोलीसांकडून शपथपत्राद्वारे सखोल अहवाल सादर करण्यास आदेश दिले. सदर बालकावर ज्या ज्या डॉक्टरांनी उपचार केले त्या सर्व डॉक्टरांनपा पुढील सुनावणीकरिता हजर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | केलेली तकार. | | राहण्याचे आदेश दिले.व सदर प्रकरण दिनांक 5 फेब्रुवारी रोजी सुनावणीकरिता ठेवले.यांना दिनांक 5 फेब्रुवारी, 2013 रोजी |
| 4 | 224 / 2012 | श्री. चेतन बळवंत चव्हाण व सतीश रामचंद्र पोवार यांनी ,सौ. मिताली व मिलींद कृष्णा कमलापुरे यांचेविरूध्द दत्तक मुलावर मारहाण केल्याबाबत आयोगाला केलेली तकार. | श्री. आशिश कुण्डपाल, विधी सल्लागार, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, कोल्हापूर, श्री. चेतन चव्हाण व सचिन मसुरकर. | अध्यक्षांनी जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण, कोल्हापूर आयोगासमोर सुनावणीकरिता बोलवावे असे आदेश दिले. नोटीसची प्रत सोबत ठेवण्यात आली आहे. |
| 5 4 | 198 / 2012 | होली फमिली स्कूल, मुंबई--- पालकांनी केलेल्या तकारीबाबत. | फादर कारगेलो, प्रिन्सिपॉल व जेनी फ्रन्सिस, व इतर पालक | शाळेच्या प्राध्यापकांनी अद्यापही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका–यांनी अद्यापि सदर प्रकरण निकाली न काढण्याबाबत सांगितले तसेच सदर प्रकरण निकाली काढण्यास हरकत नसल्याचे सांगिलि. |
| 6 | 228 / 2012 | रिव्हर व्यू पुणे व माया लॉज वाघोळी, पुणे येथे लहान मुलांना दारू दिल्याबाबत श्री. अमित मारू यांनी पोलीस अधिकारी , महानगरपालिका अधिकारी, व इतर यांचेविरूध्द केलेली तकार. | श्री. अमित मारू, तकारकर्ता | स्दर प्रकरणात अद्यापही पोलीस अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, महापालिका अधिकारी हजर न झाल्याने त्यांना भारतीय दिवाणी दंड संहिता मधील कलम 30 अन्वयें समन्स बजावून दिनांक 5 फेब्रुवारी रोजी आयोगापुढे हजर राहण्यास सांगितले. |
| 7 | 45 / 2012 | श्री. वाय. एस. दुबे, फाउंडर प्रेसिडेंट हिंद सेवा परिशद मुंबइ यांनी केलेली तकार | श्री. वाय.एस. दुबे, | आयोगाने श्री. दुबे यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 मधील कलम 270अ ची प्रत आयोगास सादर करण्याचे आदेश दिले. व सदर प्रकरण आदेशांकरिता बंद करावे असे निदेश दिले. |
| 8 | 176 / 2012 | टचिंग लाईव्हस या सेवा भावी संस्थेने मुलांची सुटका करण्याबाबत केलेल्या विलंबाबाबत आलेली तकार. | श्रीमती सुचिता तुळसकर, कार्लोयी परेरा, चाईल्ड लाईन, श्री. एस. ए. जाधव, अधीक्षक, डोंगरी निरीक्षणगृह, सोनिया मखवानी व अंकित कनानी | आयोगाने सोनिया मखवानी यांना सखोल अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. दनांक 5 फेब्रुवारी 2013 रोजी ठेवण्यात यावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | 263 / 2012 | श्री. नरेश गंगाराम गोसावी यांनी चेंबूर इंग्लिश स्कूल मागासवर्गातील विद्यार्थ्यांकडून अवैधरित्या फी वसूल केली जात असल्याची तक्रार. | श्रीमती पॉल, मुख्याध्यापिका, श्री. नरेश गोसावी व श्री जेजुरीकर, शिक्षण अधिकारी, महापालिका. | सदर प्रकरण आदेशांकरिता बंद करण्यात आले. |
| 10 | 255 / 2012 | पुढारी या वृत्तपत्रामध्ये आलेली "मुख्याध्यापकांची चिल्लर पार्टी" या मथळयाखाली आलेली माहिती. | श्री.. एम. जी. गायकवाड , प्रकल्प अधिकारी, व श्री खेकरे, मुख्याध्यापक, | प्रकल्प अधिका–यांनी याबाबतचा संपूर्ण अहवाल आयोगापुढे सादर करण्याचे आदेश दिले. व सदर प्रकरण पुढील आदेशांकरिता बंद करण्यात आले. |
| 11 | 307 / '2012 | बाल कल्याण समिती, मुंबई शहर यांनी अंजुमल मुफद्दिल यातमा या संस्थेविरूध्द केलेली तक्रार. | इस्माईल मुस्तफा, अधीक्षका व इतर. श्रीमती व्ही. आर. परूळेकर, परिविक्षा अधिकारी, जि.म.बा., मुंबई. | प्रकरण अंतिम आदेशांकरिता बंद करण्यात आले. |
| 12 | 145 / 2012 | कार्डीनल स्कूल, बांद्रा यांनी ॲडमिशन नाकारल्याबद्दल केलेली तक्रार. | मिसेस मेहता, मुख्याध्यापक, श्री. के.डी. जाधव, शिक्षक, व श्री. एन.एन. गायकवाड, निरीक्षक, शिक्षण | प्रकरण अंतिम आदेशांकरिता बंद करण्यात आले. |
| 13 | 502 / 2012 | बंडप्पा कांबळे, शिवशक्ती नगर येथे आंगनवाडी सुरू करणेबाबत. | श्रीमती ओतारी,बाल विकास प्रकल्प अधिकारी, कुलाबा, व श्री. कांबळे | प्रकरण अंतिम आदेशांकरिता बंद करण्यात आले. |
| 14 | 115 / 2012 | प्रथम या संस्थेने मदनपुरा विभागातील बाल कामगारांना मुक्त करण्याबाबत केलेली तक्रार. | श्री. नवनाथ कांबळे, प्रथम संस्था, श्री. व्ही. व्ही. सरोदे, नागपाडा पोलीस स्टेशन. | प्रकरण अंतिम आदेशांकरिता बंद करण्यात आले. |
| 15 | 261 / 2012 | रफीनगर शाळेच्या परिस्थितीबाबत केलेली तक्रार. | श्रीमती शर्मिष्ठा खंडागळे, कल्पना जाधव, व श्री. नवनाथ कांबळे प्रथम संस्था, | प्रकरण अंतिम आदेशांकरिता बंद करण्यात आले. |
| 16 | 24 / 2013 | सेंट मेरी आय.सी.एस.सी. माझगांव, मुंबई श्री. हरशित मर्चन्ट, उपाध्यक्ष, पी.टी.ए.व इतर यांनी केलेली तक्रार. | --- | संचालक, शालेय शिक्षण, पुणे व उपसंचालक, शालेय शिक्षण, चर्नी रोड मुंबई यांना दिनांक 5 फेब्रुवारी, 2013 रोजी सुनावणीकरिता हजर राहण्यास कळविण्यात यावे. सोबत नोटीसची प्रत जोडत आहे. |

( अ.ना.त्रिपाठी)
सदस्य सचिव
बाल हक्क संरक्षण आयोग

(उज्वल उके )
प्रभारी अध्यक्ष
बाल हक्क संरक्षण आयोग